लोकमत भारत — शुक्रवार, 15 फेब्रुवारी 2019

# कमला कॉलेजमध्ये उद्या कार्यशाळा

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

कमला कॉलेजमध्ये १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता 'भारतीय शेतकऱ्यांच्या व्यथा वेदना दशा, समस्या व आव्हाने" या विषयावरील चर्चासत्राचे उद्‌घाटन खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते होणार आहे. ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील अध्यक्षस्थानी आहेत, अशी माहिती प्रभारी प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी दिली.

पत्रकात म्हंटले आहे, 'भारतीय शेतकऱ्यांच्या व्यथा वेदना दशा, समस्या व आव्हाने' विषयावरील चर्चासत्रासाठी डॉ. भारत पाटणकर, गेल ऑमवेट, माजी आमदार संपतराव पवार-पाटील, स्कॉट कफोरा (अमेरिका), डॉ. एस. एन. पवार, प्राजक्त पाटील, डॉ. जालंदर पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या चर्चासत्रात हवामान बदलांचे शेतीवरील परिणाम, आर्थिक धोरण व शेती, शेतीमाल उत्पादन , मराठी, हिंदी व इंग्रजी साहित्यातून घडणारे शेतकरी जीवन दर्शन, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कर्जमाफी आदी विषयावर शोधनिबंध सादर केले जाणार आहेत. तरी प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कॉलेजने केले आहे.

**—**

**विषय: भारतीय शेतकऱ्यांच्या समस्या व आव्हाने**